# प्रेस नोट

दिनांक - ०७/०४/२०२४

**कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई च्या पथकाने एम.डी. (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थाच्या गुन्ह्यातील आंगडीयास अटक केलेबाबत ....**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र. १२/२०२४, कलम ८ (क), २२ (क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायदा (कुर्ला पोलीस ठाणेस, वि. स्था.गु.र.क्र. ६७/२०२४) |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दिनांक १६/०२/२०२४ रोजी ००.४० वा. च्या सुमारास |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक १६/०२/२०२४ रोजी १४.५५ वा. |
| घटनास्थळ | सयाजी पगारे चाळच्या बाजुच्या फुटपाथवर, सि.एस.टी. रोड, चेंबुर-सांताक्रुझ लिंक रोड, कुर्ला (प), मुंबई. |
| अटक आरोपीतांची संख्या | एकुण ११ (१० पुरूष आरोपी व ०१ महिला आरोपी) |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) एकुण १२६ किलो ६४१.५ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ, किं.रू.२५२,२८,००,०००/-<br>२) रोख रक्कम रू. ०३,६२,५६,२००/-<br>३) २५.०७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे, अं.कि.रू. १,५०,४२०/-<br>४) सफेद रंगाची स्कोडा मोटार कार, अं.कि.रू. १०,००,०००/-<br>एकुण किंमत रू. २५६,०२,०६,६२०/-<br>(रूपये दोनशे छप्पन करोड दोन लाख सहा हजार सहाशे वीस) |

**थोडक्यात हकिगत** - कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबईच्या पोलीस पथकास मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक १६/०२/२०२४ रोजी सापळा रचुन एका महिला आरोपीस चेंबुर-सांताक्रुझ लिंकरोड, कुर्ला (प), मुंबई येथुन एकुण ६४१ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच अंमली पदार्थाचे व्यवसायामधुन मिळविलेली रोख रक्कम रू. १२.२० लाख रूपये व २५ ग्रॅम (कि.अं.रू. १,५०,४२०/-) सोन्याच्या दागिण्यांसह अटक करण्यात आली. सदरबाबत कुर्ला पोलीस ठाणे येथे वि.स्था.गु.र.क्र. ६७/२०२४, कलम ८(क), २२(क), २९ अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा नोंद करून सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांवे आदेशान्वये पुढील तपासासाठी कक्ष-७ कार्यालयाकडे घेण्यात आला.

नमुद महिला आरोपीताकडे केलेल्या चौकशीत तीने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ मिरा रोड येथील तीच्या ओळखीच्या इसमाकडुन आणला असल्याचे सांगितले. त्यावरुन कक्ष-७ चे पथकाने एका पुरुष आरोपीतास मीरा रोड येथुन ०३ कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. हा अंमली पदार्थ (अं.कि.रू. ६ कोटी) व रू. ३.६८ लाख रोख रक्कमेसह ताब्यात घेऊन सदर गुन्ह्यात अटक केली. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा एम.डी. हा अंमली पदार्थ सुरत, गुजरात येथे राहणाऱ्या ०२ इसमांना दिल्याचे सांगितल्याने सदर इसमांना सुरत, गुजरात येथुन अटक करण्यात आली.

सदर गुन्ह्याचा तपास चालु असताना आरोपीतांकडे व साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीवरुन तसेच तांत्रिक तपासाव्दारे आणि पोलीस पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी पाळत ठेवुन प्राप्त माहितीच्या आधारे दिनांक २५/०३/२०२४ रोजी सांगली जिल्ह्यातील कवठे महाकाल पोलीस ठाणे हद्दीत इरळी या गावात धडक कारवाई करून एम.डी. हा अंमली पदार्थ बनविणाऱ्या कारखान्याचा शोध घेऊन एकूण १२२.५०० कि.ग्रॅ. वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ (अं.कि.रू.२४५ कोटी) तसेच एम.डी. बनविण्यासाठी वापरण्यात येणारे साहीत्य व गुन्हयात वापरलेले वाहन ताब्यात घेतले. सदर कारवाईमध्ये एकुण ०६ पुरुष आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयांमध्ये अद्यापपर्यंत एकूण १० पुरूष आरोपी व ०१ महिला आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

**तसेच गुन्ह्यातील मुख्य आरोपीताकडे केलेला तपास व तांत्रिक तपासामध्ये त्याने अंमली पदार्थ विक्रीतुन कमावलेले एकुण ०३,४६,६८,२००/- रूपये भिवंडी रोड, जिल्हा-ठाणे येथुन जप्त करण्यात आलेले आहे. सदरचे पैसे अंगडीयाच्या मार्फतीने ज्या व्यक्तींना एम.डी. या अंमली पदार्थाचा पुरवठा करण्यात आला त्यांनी पाठविले असल्याचे तपासामध्ये स्पष्ट झाल्याने सदरचे पैसे एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्रेत्यांकडुन घेऊन मुख्य आरोपीतास देणाऱ्या हवाला व्यवसायीक जेसाभाई मोटाभाई माली यास नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.**

**अशा रितीने अंमली पदार्थाची निर्मिती व विक्री करणाऱ्या टोळीसाठी पैशांच्या देवाण घेवाणीचे काम करणाऱ्या हवाला व्यवसायीकास अटक करण्यात कक्ष-७ चे पथकास यश आले आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त, विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शशी कुमार मिना, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) दत्ता नलावडे, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) विशाल ठाकूर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व) चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तावडे, पो.नि. आत्माजी सावंत, स.पो.नि. अमोल माळी (कक्ष-५), पो.उ.नि. रामदास कदम, पो.उ.नि. स्वप्निल काळे, पो.उ.नि.महेश शेलार, पो.ह.क्र. ३४१७७/राजेंद्र शिंदे, पो.ह.क्र. ०३८३५/प्रमोद जाधव, पो.शि.क्र. ०९०५७२/जितेंद्र पाटील, पो.शि.चा.क्र. १५०८६३/दिलिपराव राठोड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

***** D-1/ /2024 *****